International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# महाराष्ट्रीय बंजारा संस्कृती आणि जीवन पद्धती

**कु. शितल नारायण जाधव[1], प्रा.डॉ.लता जवाडे[2]**
*[1]राजस्थान आर्य महाविद्यालय, (मराठी विभाग )वाशिम.*
*[2]मार्गदर्शक*
*मराठी विभाग प्रमुख राजस्थान आर्य महाविद्यालय, वाशिम*
*Corresponding Author – कु. शितल नारायण जाधव*
**DOI - 10.5281/zenodo.15245381**

**प्रस्तावना:**

बंजारा ही महाराष्ट्रात तसेच संपूर्ण भारतातीलच एक प्राचीन आणि सांस्कृतिक समृद्धीचा भाग असलेला समाज आहे.ग्रामीण भागात तांड्यावर राहणाऱ्या बंजारा स्त्रिया व पुरुष यांनी आपल्या पारंपरिक जीवनशैलीला कायमस्वरुपी स्वरूपदिले आहे विशेषतः बंजारा महिलांची वेशभूषा,केशभूषा,दागिने,लोकगीत,भजन- कीर्तन तसेच त्यांचे आचार-विचार समाजाच्या सांस्कृतिक ओळखीचा भाग आहे. बंजारा समाजाचा सांस्कृतिक इतिहास केवळ त्यांच्या सण- उत्सवामध्ये नाही तर त्यांच्या खाद्यसंस्कृतीत, जीवनशैलीत आणि नवसाच्या प्रथा मध्येही रुजलेला आहे.पुरुष आणि स्त्रिया दोघेही पारंपरिक वेशभूषा,भजन-कीर्तन आणि विविध सण उत्सवामधून् ही आपली संस्कृती टिकवून ठेवत आले आहेत .

**बंजारा संस्कृती:**

**1) बोली:** मुख्यतः भटकंती,मालवाहतूक व शेती काम करणाऱ्या या समाजाला ' गोरं ',' गोरमाटी ' किंवा ' लमाणी ' असेही म्हंटले जाते. बंजारा, लमाणी ही बोली राजस्थानी,कर्नाटकी, हिंदी ,मराठी भाषेतील शब्द मिश्रित आहे परंतु काळानुसार यात बरेच इतर भाषेतील शब्द ही समाविष्ट होत आहे.

**2) वेशभूषा:** बंजारा समाजातील स्त्रियांची वेशभूषा ही आगळ्यावेगळ्या पद्धतीची असून वैशिष्ट्यपूर्ण आहे.बंजारा स्त्रिया रूपाने सुंदर व शरीराने काटक स्वरूपाच्या असतात.भडक रंगाचा "फेटिया-काचळी"(घागरा व चोळी) आणि डोक्यावरून पायापर्यंत "ओढणी" असते.

लोकर, काचेचे लहान आरशे (भिंग),जुने रुपये(नाणी),गोंडे व कवड्या वापरून स्वतःच्या हाताने सजवलेली असते. याच बरोबर बंजारा स्त्रिया हाताच्या कोपऱ्यापर्यंत हस्तीच्या दांताच्या किंवा पितळेच्या बांगड्या घालतात तर दंडामध्ये (वाळी )"कोपऱ्या" घालतात तसेच नाणी-मणीची हार,चांदीची साखळी,मण्याची चोपडी,हसली(चांदीचा गोल गडा)आणि "डोरल" घालतात.नाकात "भुरिया "(मोठी नथणी) जो सोने किंवा पितळीच्या धातूच्या बनलेला असतो.पायात चांदीचे "वाळे" अथवा पैंजण,पायाच्या बोटात "चटकी"(जोडवी) असते.परंतु अलीकडील काळात या समाजातील स्त्रियांनी आधुनिक पद्धतीने पेहराव सुरू केला आहे.जसे की साडी,मनगटात काचेच्या बांगड्या इत्यादी.

पुरुषाचा पेहराव "धोती,झगला/बंडी "(धोतर-कुर्ता) व डोक्याला पांढरे किंवा लाल रंगाचे पागोटे "पगडी",हातात चांदीचा कडा असायचा परंतु सद्यस्थितीत आधुनिक पोशाख "शर्ट-पँट" हे आहे.

थोडक्यात बंजारा समाजाची वेशभूषा आगळीवेगळी आहे म्हणूनच त्याला "गोरं समाजेरो बानो" असे म्हणतात.

**3) केशभूषा:** या समाजातील स्त्रियांची केशभूषा सुध्दा वेगळी आहे ज्याला "आटी-चोटला" म्हणतात.या केशभूषेसाठी स्त्रीचे केश पाच भागात विभागले जातात त्यासाठी डोक्याच्या मध्यभागी भांग पाडून केश कानावर सोडले की दोन्ही कानावर येणाऱ्या कशापासून दोन वेण्या बनवतात या वेणीच्या मध्यभागी कानाच्या खाली "घुगरी- टोपली"गुंफतात व उरलेले केश डोक्याच्या मागे घट्ट बांधतात ही केशभूषा अतिशय किचकट आहे.केशभूषा करताना एखाद्या दुसऱ्या स्त्रीची मदत घ्यावी लागते व साधारणतः अर्धा,एक तास लागतो.

**4) खाद्यसंस्कृती:** समाजात खाद्यसंस्कृतीला ही विशेष महत्व आहे.बाजरी,ज्वारीच्या भाकरी, बकऱ्याचे मटण,बकऱ्याची मुंडी,खरिया(खुर) यांची सळोई (ओजरी) तसेच मसालेदार पदार्थ, डाळी इत्यादीचा समावेश बंजारा संस्कृतीत होतो.

**5) सण-उत्सव:** बंजारा समाजात सण-उत्सव मोठ्या उत्साहाने साजरी करतात.

**क्रांतिकारी धर्मगुरू संत सेवालाल जयंती:** संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीला बंजारा समाजात अनन्य साधारण महत्व आहे.संत सेवालाल महाराज जयंती दरवर्षी 15 फेब्रुवारी रोजी साजरी केली जाते.हे महान संत ,समाजसुधारक व बंजारा समाजाचे पूजनीय धर्मगुरू संत सेवालाल महाराज यांचा जन्मदिन म्हणून साजरा केला जातो.संत सेवालाल महाराज यांनी आपल्या विचाराद्वारे लोकांमध्ये एकता,सत्य आणि मानवतेचा संदेश पसरवला,त्यांनी बंजारा समाजाला शिक्षण, नैतिकता आणि धर्माचे महत्व पटवून दिले समाजात अन्याय, अंधश्रद्धा आणि भेदभाव दूर करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.महाराजांना जणू दूरदृष्टीचा होती त्या प्रमाणे त्यांनी समाजाला संदेश दिले.या दिवशी बंजारा समाजामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम,भजन-कीर्तन आयोजित केली जातात व गावोगावी बंजारा समाज एकजुटीने धर्मगुरू संत श्री सेवालाल महाराजांचा जन्मदिवस "सण - उत्सव" म्हणून साजरी करतात.

**संत सेवालाल महाराजांनी समाजाला दिलेला संदेश :**

1. माणुसकीवर प्रेम करा.
2. सन्मानाने आयुष्य जगा.
3. इतरांशी वाईट बोलू नका,भेदभाव करू नका व इतरांना इजा पोहचतील असे वागू नका.
4. स्त्रियांचा सन्मान करा,परस्त्री आई,बहिणी समान समजा त्यांचा आदर करा आणि मुली जिवंत देवी असतात त्यांना जपा.
5. वडीलधारी माणसांचा आदर करा आणि तरुणांवर प्रेम करा आणि प्राण्यांचा देखील आदर करा.
6. जंगल आणि पर्यावरणाचे रक्षण करा.झाडे तोडू नका, झाडे लावा व त्यांना जगवा.
7. पाणी जपून वापरा,तहानलेल्याना पाणी द्या,पाण्याचे निःशुल्क दान करा,जे सर्वात मोठे पुण्य आहे.
8. अभ्यास करा,ज्ञान मिळवा व इतरांना ज्ञान वाटा, मनन करा. मनन केल्याने आंतरिक शांती मिळते.
9. आयुष्यावर तर्क करा,अंधश्रध्दा पासून दूर रहा. आणि सर्व अंधश्रद्धायुक्त विश्वास टाळा.
10. काळजी करू नका आणि संकटाला निर्भयपणे सामोरे जा,धैर्यवान,निष्ठावान व आत्मविश्वासू बना.

**तिज:** तिज हा बंजारा समाजाचा महत्वपूर्ण पारंपरिक सण आहे.जो स्त्रियांसाठी खास महत्वाचा आहे.हा सण श्रावण महिन्यात साजरा केला जातो आणि निसर्ग,सौंदर्य.प्रेम आणि एकतेचे प्रतीक मानला जातो.बंजारा तीनमध्ये स्त्रिया पारंपरिक वेशभूषा करतात.दागिने घालतात आणि उत्साहाने नाचत - गात "गण - गौर"(राधा - कृष्णा)ची आराधना करतात व आपल्या कुटुंबासाठी आरोग्य,सुख - समृद्धीची प्रार्थना करतात.बंजारा तिज उत्सव सांस्कृतिक महत्व असून

बंजारा समाजाच्या परंपरा,संस्कृती आणि एकात्मता दर्शविणारा आहे.

**दिवाळी:** दिवाळी ही दोन दिवसाची साजरी केली जाते. बंजारा बोलीत दिवाळीला "दवाळी" म्हणतात. अश्विन अमावस्येचा पहिला दिवस काळी अमावस म्हणून ओळखली जाते या दिवशी बकऱ्याची बळी देऊन देवीची पूजा केली जाते.हा दिवस पहिला दिवस असतो. याच दिवशी संध्याकाळी तांड्यातील अविवाहित मुली दिवे लावलेली पणती हातात घेऊन प्रथमतः नायकाच्या व त्या नंतर प्रत्येक बंजारा बांधवांच्या घरी जाऊन ओवाळणी करतात ."वर्षे दनेरी कोड दवाळी बापू तोण मेरिया,वर्षे दनेरी कोड दवाळी याडी तोण मेरीया "असे बंजारा मुली गीत गातात व आपापल्या परीने बंजारा बांधव मेरिया (पैश्याच्या स्वरूपात आशीर्वाद) देतात.दिवाळीचा दुसरा दिवस म्हणजेच गोधनाची पूजा .दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी भल्या पहाटेच रानातून "बोरू - लामडी"(तिकडीचे गवत )आणि फुले आणतात. घरो-घरी गाईच्या शेणाने गोधन करून त्यावर बोरू - लामडि,फुल रोवून त्याची पूजा करतात .गोधणाची पूजा केल्याशिवाय अविवाहित मुली अन्नाला हात सुध्दा लावत नाही अश्याप्रकारे बंजारा समाजात दिवाळी साजरी केली जाते.

**होळी:** होळी हा सण बंजारा समाजात पारंपरिक पद्धतीने साजरी केला जातो.होळी साजरी करताना त्यात पारंपरिक नृत्य,गाणी आणि एकत्रित येऊन रंग उधळणे त्याचबरोबर या उत्सवात बंजारा समाजाचे लोक त्यांच्या सांस्कृतिक परंपरा जपण्यासाठी,त्यांच्यातील सामूहिक भावना व आनंद होळीच्या माध्यमातून व्यक्त करतात. बंजारा समाजातील दिवाळी प्रमाणेच होळी ही दोन दिवसाची असते.पहिल्या दिवशी होलिका दहन करून मनातील वाईट भावना - विचार याचेही दहन करतात. आनंदात होळी भोवती नाच - गाणी करतात, त्या दिवशी पूर्ण दिवस नाचतात व संध्याकाळी पुन्हा होळीची पूजा करून प्रार्थना करतात. आमच्यातील वाईट विचार,वैल भावनाला नष्ट कर व आम्हाला आरोग्य,सुख - समृध्दी दे अशी होलिका मातेला प्रार्थना करतात आणि दुसऱ्या दिवशी नाच - गाणी करून दिर - भावजय,नणंद -भावजय किंवा थटेच्या लोकांसोबत रंग खेळतात.या दिवशी तांड्यातील लोक "गैर", तांड्यातील लोकांकडून पैसे जमाकरून बकरा कापतात व त्या बकऱ्याच्या मटणाचे सारखे भाग करून सर्वात वाटून घेतात त्यात नायक, कारभारीचा जास्तीचा हिस्सा असतो त्यालाच "गैर" म्हणतात अश्या प्रकारे बंजारा समाजात सण - उत्सव साजरी करतात.

**निष्कर्ष**:

बंजारा समाज हा अत्यंत सुसंस्कृत आणि संपन्न असलेला आहे.वेगवेगळ्या पारंपरिक वेशभूषा,खाद्यसंस्कृती, बोलीभाषा,प्रथा - परंपरा यांच्या माध्यमातून त्यांनी आपली संस्कृती जतन केली आहे. मात्र, कालांतराने होणाऱ्या बदलाचा परिणाम बंजारा समाजावर होत आहे.आधुनिकतेच्या प्रभावामुळे काही परंपरा , चाली - रीती लोप पावत आहे,तर काही मध्ये परावर्तन होत आहे.

या पार्श्वभूमीवर,बंजारा समाजाच्या संस्कृतीचे जतन करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.पारंपरिक वेशभूषा,गाणी,खाद्यपदार्थ आणि सण - उत्सव यांचा अभ्यास करून त्यांचे दस्तऐवजीकरण करणे ही काळाची गरज आहे.

**संदर्भ :**

1. प्राथमिक साधने
2. आत्माराम कानिराम राठोड :गोरं बंजारा समाजाचा इतिहास
3. सहा.प्रा.विलास सोमजी पवार,समाजशास्त्र विभाग हिंगोली. www.jetir.org (ISSN-2349-5162)
4. अनिल प्रल्हाद राठोड: M.A इतिहास लातूर (लेख)
5. दैनिक दिव्य मराठी
6. दैनिक सकाळ
7. किसन राठोड, गोरं विचारमंथन
8. प्रा.डॉ.विजय मेरसिंग जाधव वाशिम, sgbau पुस्तक : क्रांतिसिंह सेवालाल महाराज